# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(दुपार)**

जा.क्र. ३८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०४/०७/२०१६.

**१) प्रकृती बिघडल्याने उपचारा दरम्यान मृत्यु. :—**

दिनांक ०३/०७/०१६ रोजी १४.०० ते १४.३० वा. दरम्यान शेखर हिरामण तितीरमारे वय ३७ वर्ष, रा. क्वॉर्टर नं. ११४/०१ टाईप १ जवाहरनगर यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना औषधोपचारा करीता आयुध निर्माणी दवाखाण्यात भरती केले होते, परंतु उपचारा दरम्यान ते मरण पावले. असे फिर्यादी उमेश हिरामण तितीरमारे वय ३२ वर्ष, रा. खैरी/सालेबर्डी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोउपनि. पाटील पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) विषारी औषध खाल्याने इसमाचा मृत्यु—:**

दिनांक ०३/०७/२०१६ रोजी १७.०० ते २०.०० वा. दरम्यान माधव पांडुरंग वैद्य वय ५२ वर्ष, रा. गांधी वार्ड मांगली हे शेतावरून काम करून घरी परत आला व आंघोळ करून चहापाणी घेवुन घरच्या छपरीत पलंगावर लेटले असतांना रात्री २०.०० वाजता दरम्यान त्यांच्या पत्नीने त्यांना जेवण करण्यास आवाज दिला, त्यांनी काही हालचाल न केल्याने तीने फिर्यादी दिनकर पांडुरग वैदय वय ३६ रा. गांधी वार्ड मागली यांना सांगुन त्यांनी तोंडाची विषारी औषध खाल्यासारखी वास येत आहे असे सांगीतले, त्यांना औषधोपरचारा करीता ग्रा.रू. पवनी येथे आणले होते, त्यांना डॉ. ने तपासुन मृत घोषीत केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोउपनि. गोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत .

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ०३/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०१ केसस, तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व इतर वाहनांवरती ११३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**(के.एच.धात्रक)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत — संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर देण्याकरीता